स्वप्नपूर्तीकडे वाटचाल • भुयारीमार्गाला गती : बोरिंग मशिन्स २४ सप्टेंबरला चीनहून जेएनपीटी बंदरात येणार

# बुलेट ट्रेनच्या कामातील मोठा अडथळा झाला दूर

सुरेखा चोपडे । नवराष्ट्र

**मुंबई.** मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पातील मोठा अडथळा दूर झाला आहे. बुलेट ट्रेनचा भुयारी मार्ग उभारण्यासाठी आवश्यक दोन टनेल बोरिंग मशिन (टीबीएम) चीनमधील बंदरात अडकल्या होत्या. त्यामुळे बुलेट टेनच्या भुयारी बांधकामाचे वेळापत्रक कोलमडण्याची भीती होती. दरम्यान, काही दिवसांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी चीन दौऱ्यावर गेले होते. त्यावेळी झालेल्या सकारात्मक चर्चेमुळे या मशिन्स मुंबईकरिता मार्गस्थ झाल्या आहेत. बुधवार २४ किंवा गुरुवार २५ सप्टेंबर रोजी या मशिन्स जेएनपीटी बंदरात येणार आहेत. यामुळे बुलेट ट्रेनच्या भुयारी बांधकामाला गती मिळणार आहे.




मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनसाठी १.०८ लाख कोटींची गुंतवणूक केली आहे. या प्रकल्पातील सावली-विक्रोळी, विक्रोळी-बीकेसी आणि विक्रोळी-सावलीदरम्यान भुयारी मार्ग तयार करण्यासाठी एकूण तीन 'टीबीएम'चा वापर करण्याचे नियोजन आहे. जून २०२३ मध्ये अफकॉन्सला या भुयारी बांधकामासाठी सहा हजार ३९७ कोटींसह करारबद्ध करण्यात आले.

सध्या बीकेसी (३६ मीटर खोल), विक्रोळी (५६ मीटर) आणि सावली (३९ मीटर) येथे तीन उभ्या शाफ्ट बांधण्यात येत आहेत. यामधून 'टीबीएम' प्रत्यक्ष बांधकाम जागेवर पोहोचून कार्यान्वित होणार आहे. ठाणे खाडीच्या समुद्राखालील सात किमीचा भाग याच्याच मदतीने उभारण्यात येणार आहे.

## पंतप्रधान नरेंद्र मोदींनी चीन दौऱ्यात केले प्रयत्न

जर्मनीतील 'टीबीएम' विशेषज्ञ हेरेनक्नेट यांना टीबीएमची ऑर्डर दिली होती. या 'टीबीएम' चीनमधील ग्वांगझू येथे तयार करण्यात येत होत्या. त्या ऑक्टोबर २०२४ पर्यंत भारतात येणे अपेक्षित होते. परंतु, त्या आल्या नाहीत. त्यामुळे भुयारी काम रखडले. भारतीय रेल्वे मंत्रालयाने हे प्रकरण परराष्ट्र मंत्रालयाकडे नेले. 'टीबीएम' सह अन्य उपकरणे सोडण्यासाठी राजनैतिक मार्गाचा अवलंब करण्यात आला. परंतु त्यात यश आले नाही. दरम्यान, पंतप्रधान मोदी यांच्या चीन दौऱ्यामुळे टीबीएम मिशन्सचा मुंबईत येण्याचा मार्ग मोकळा झाला.